| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**<br>**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)** | |

## प्रेसनोट दि. ०३/०७/२०२३

**मयत सोन्या तापकिर याचे खुनाचे गुन्हयातील मास्टर माईंड कुख्यात सराईत आरोपी करण रोकडे सह ०३ आरोपींना भारत नेपाळ बॉर्डरवरुन गुंडा विरोधी पथकाने घेतले ताब्यात.**

दि. २२/०५/२०२३ रोजी चिखली पुणे येथे राहणारा सोन्या तापकिर हा चिखली परीसरात वरचढ होईल व तो आपलाच काटा काढील या भितीने सराईत आरोपी करण रोकडे याने त्याचे साथीदारांचे मदतीने कट रचुन चिखली येथीलच सोन्या पानसरे व ०१ विधी संघर्षीत बालक यांचेकरवी पिस्तुलाने गोळीबार करुन खुन केला होता, सदर घटने बाबत चिखली पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ३४६/२०२३,भा.द.वि.क.३०२,१२०(ब) भा.ह. का. कलम ३,५,२५ महा.पो.का.क. ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयातील मास्टर माईड कुख्यात सराईत आरोपी **१) करण रतन रोकडे, वय २५ वर्षे रा. आंबेडकर भवन समोर, चिंतामनीनगर, रोकडे वस्ती, चिखली, पुणे हा त्याचे आणखी ०३ साथीदार नामे २) ऋत्विक ऊर्फ मुंग्या रतन रोकडे रा. सदर ३) रिंकु दिनेश कुमार, वय १९ वर्षे, रा. व ४) विधी संघर्षीत बालक, रा. सदर** यांचेसह गुन्हा घडल्यापासुन अटक चुकवण्यासाठी **लोणावळा, गोवा, मध्यप्रदेश, गुजराथ व उत्तरप्रदेश** या राज्यामध्ये राहण्याची ठिकाणे वेळोवेळी बदलून व स्वतःचे अस्तित्व लपवुन रहात होता. गुंडा विरोधी पथकातील **मयुर दळवी, सुनिल चौधरी व विजय तेलेवार** यांचे टिमला त्यांचे बातमीदारामार्फत करण रोकडे बाबत माहीती प्राप्त झाली. सदर माहीतीच्या आधारे पोलीस अंमलदार **शाम बाबा** यांनी केलेल्या तांत्रीक विश्लेषणावरुन आरोपी करण रोकडे हा मथुरा राज्य उत्तरप्रदेश येथे असले बाबत खात्रीशीर माहीती प्राप्त झाली. मा. वरिष्ठांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने व स्टाफ असे मथुरा, उत्तरप्रदेश येथे जावुन माहीती घेतली असता करण रोकडे हा मथुरे पासुन सुमारे ७५० किलोमीटर लांब भारत नेपाळ बॉर्डर पासुन जवळ **मधुबन, जि. मऊ राज्य उत्तरप्रदेश** येथे असुन तो नेपाळ येथे पळुन जाण्याचे तयारीत असले बाबत माहीती प्राप्त झाली, लागलीच गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार असे सदर ठिकाणी जावुन ते रहात असलेल्या इमारतीची माहीती घेवुन सदर इमारतीला स्थानिक पोलीसांचे मदतीने वेढा घातला असता, आरोपी करण रोकडे यास पोलीसांची चाहुल लागता तो त्याचे वरील ०३ साथीदारांसह पहील्या मजल्यावरुन उडी मारुन शेतामध्ये पळुन जात असताना त्यांचा पाठलाग करुन त्यांना शिताफिने पकडुन पिंपरी चिंचवड येथे आणुन त्यांना चिखली पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असता त्यांना मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो. मोरवाडी कोर्ट,पिंपरी पुणे येथे हजर करुन त्यांची दि.०६/०७/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चिखली पोलीस ठाणे हे करीत आहेत.

आरोपी करण रतन रोकडे याचेवर दाखल असलेले गुन्हेः-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. |
|---|---|---|
| १ | निगडी | ५५६/२०१७, भा.द.वि. ३२४,५०४,३२३,१४३,१४७,५०६,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| २ | निगडी | ५८७/२०१७, भा.ह.का.कलम ३(२५), म.पो.का.क.३७(१)सह १३५ |
| ३ | चिंचवड | ८०/२०१७, भा.द.वि. ३०७,१४३,१४७,१४८,१४९,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| ४ | चिंचवड | ९९/२०१७, भा.द.वि. ३०७,१४३,१४७,१४८,१४९,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ५ | देहुरोड | ५९१/२०१७, भा.द.वि. ३०७,१४३,१४७,१४८,१४९,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| ६ | चिखली | २२६/२०२०, भा.द.वि. ३२३,३२४,३४ |
| ७ | रावेत | ५७१/२०२१, भा.ह.का.कलम ३(२५), म.पो.का.क.३७(१)सह १३५,१४२ |
| ८ | शिक्रापुर | १५९/२०१६, म.पो.का.क.१२२ |
| ९ | बंडगार्डन | १०३/२०१७, म.पो.का.क.३७(१)(३)सह १३५, |
| १० | चिखली | १०६/२०२३, महा. दारुबंदी कायदा कलम ६५(ई) |
| ११ | चिखली | ३४६/२०२३,भा.द.वि.क.३०२,१२०(ब) भा.ह.का.कलम ३,५,२५ महा.पो.का.क. ३७(१)(३) सह १३५ |

आरोपी ऋत्विक ऊर्फ मुंग्या रतन रोकडे याचेवर दाखल असलेले गुन्हेः-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. |
|---|---|---|
| १ | निगडी | ५५६/२०१७, भा.द.वि. ३२४,५०४,३२३,१४३,१४७,५०६,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| २ | चिखली | २२६/२०२०, भा.द.वि. ३२३,३२४,३४ |
| ३ | चिखली | २२९/२०२१, भा.द.वि. ३०७,१४३,१४७,१४८,१४९,म.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| ४ | चाकण | ६५९/२०१७, भा.द.वि. ३९५ |
| ५ | चाकण | ११२३/२०१७, भा.द.वि. ३९५ |
| ६ | चाकण | ४३७/२०१७ भा.द.वि. ३९५ |
| ७ | चाकण | ११५१/२०१७ भा.द.वि. ३९५ |
| ८ | निगडी | ६९६/२०१८, भा.ह.का.कलम ३,५,२५,२७ म.पो.का.क.३७(१)सह १३५ |
| ९ | लोणीकंद | ३६८/२०१८, भा.ह.का.कलम ४(२५), म.पो.का.क.३७(१)सह १३५ |
| १० | चिखली | ३४६/२०२३,भा.द.वि.क.३०२,१२०(ब) भा.ह.का.कलम ३,५,२५ महा.पो.का.क. ३७(१)(३) सह १३५ |

आरोपी रिंकु दिनेश कुमार याचेवर दाखल असलेले गुन्हेः-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. |
|---|---|---|
| १ | चिखली | १४१/२०२२, भा.द.वि. ३९९,४०२,३४ (पाहीजे आरोपी) |
| २ | चिखली | ३४६/२०२३,भा.द.वि.क.३०२,१२०(ब) भा.ह.का.कलम ३,५,२५ महा.पो.का.क. ३७(१)(३) सह १३५ |

सदरची कारवाई ही मा. श्री. विनयकुमार चौबे सो., पोलीस आयुक्त, मा. डॉ. श्री. संजय शिंदे सो. सह पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी सो. अपर पोलीस आयुक्त, स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सतिश माने, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे एच.व्ही.माने सहायक पोलीस निरीक्षक, सागर पानमंद, सहाय्यक पोलीस निरीक्षक (तांत्रीक विश्लेषण विभाग) तसेच पोलीस अंमलदार- हजरत पठाण, प्रविण तापकिर, सोपान ठोकळ, गंगाराम चव्हाण, विक्रम जगदाळे, गणेश मेदगे, विजय गंभिरे, सुनिल चौधरी, नितीन गेंगजे, शाम बाबा, विजय तेलेवार, मयुर दळवी, रामदास मोहीते, शुभम कदम, ज्ञानेश्वर गिरी, तौसीफ शेख तसेच तांत्रीक विश्लेषण विभागाचे नागेश माळी व पोपट हुलगे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

Scanned with OKEN Scanner